सत्यमेव जयते
महाराष्ट्र वनविभाग

**संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांचे कार्यालय**

मु.पो.चिचपल्ली, मुल रोड, ता.जि.चंद्रपूर, 441224 (महाराष्ट्र)

दूरध्वनी क्र.- 07172 272999 E-mail :- brtcchichpalli@gmail.com

**<u>नोटीसबोर्ड/संकेतस्थळ</u>**

**क्रमांक-कक्ष-2/योजना**/2025-26/1022 **दिनांक** :- 14/01/2026

# जाहिरात

**विषय : बांबू आधारित सामूहिक उपयोगिता केंद्र (CFC) शेडेगाव, चिमूर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) चालविण्यासाठी अनुभवी संस्थांकडून अर्ज मागविणेबाबत**

राष्ट्रीय बांबू मिशन (NBM) अंतर्गत तसेच महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र.संकीर्ण-2020/प्र.क्र.154/फ-9, दिनांक 30 मार्च 2021 अन्वये सूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे आधारे बांबू आधारित सामूहिक उपयोगिता केंद्र (Common Facility Centre – CFC) शेडेगाव, चिमूर (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) यांचे व्यवस्थापन व संचालन करण्यासाठी पात्र व अनुभवी संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

❖ **पात्र अर्जदार** : नोंदणीकृत बचत गट, संयुक्त वन व्यवस्थापन समिती (JFMC), बांबू क्षेत्रांत काम करणारी अनुभवी खाजगी संस्था किंवा उद्योजक

❖ **तांत्रिक व व्यावसायिक अटी :**

1) बांबू प्रक्रिया, उत्पादन, मूल्यवर्धन व विपणन क्षेत्रातील किमान 3 वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
2) अर्जदार संस्थेकडे प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक आहे.
3) प्रशिक्षित मनुष्यबळाची सविस्तर अनुभव यादी (Name, Qualification, Training, Experience, Role) अर्जासोबत जोडणे अनिवार्य राहील.
4) बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र / महाराष्ट्र बांबू विकास मंडळ / शासन मान्यताप्राप्त संस्थेमार्फत प्रशिक्षण घेतलेले मनुष्यबळ असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
5) संस्थेने स्थानिकांना काम देण्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सोबत जोडावे.(स्वयंघोषणा पत्राचा प्रारूप अर्जासोबत जोडलेला आहे.)

❖ **आर्थिक व कायदेशीर अटी :**

1) अर्जदार संस्था GST नोंदणीकृत (GST Registration) असणे अनिवार्य आवश्यक आहे.
2) मागील 3 आर्थिक वर्षांचे आयकर विवरणपत्र (Income Tax Return – ITR) सादर करणे बंधनकारक राहील.
3) शासन निर्णयानुसार ₹50,000 ते ₹2,00,000 पर्यंत अनामत रक्कम भरण्याची तयारी असावी.
4) शासन / निमशासकीय / वित्तीय संस्थांकडील कोणतीही थकबाकी नसल्याचे स्वघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

❖ **नियुक्ती कालावधी :**

प्रारंभी 1 वर्षांसाठी करार, समाधानकारक कामगिरीच्या आधारे 1 वर्ष वाढीची तरतूद करण्यात येईल.

❖ **अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

1) संस्थेची नोंदणी प्रमाणपत्राची प्रत
2) GST नोंदणी प्रमाणपत्र
3) मागील 3 वर्षांचे ITR प्रत
4) प्रशिक्षित मनुष्यबळाची अनुभव यादी (स्वाक्षरीसह)
5) प्रशिक्षण प्रमाणपत्रांच्या प्रती
6) बँक खाते तपशील
7) अनामत रकमेचा पुरावा
8) CFC संचालनाबाबत संक्षिप्त कार्ययोजना (Business / Operational Plan)

❖ **अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख :**

सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 7 दिवसाचे आत इच्छुक पात्र संस्था / उद्योजकांनी आपले अर्ज सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित संचालक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली यांच्या कार्यालयात स्वत:, पोस्टाने किंवा मेलद्वारे सादर करावेत. सदर निवड प्रक्रिया पूर्णतः शासन निर्णयातील तरतुदीनुसार राबविण्यात येईल. अपूर्ण अथवा अटींची पूर्तता न करणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**अर्ज सादर करण्याकरिता कार्यालयाचा पत्ता :- संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली**
**हनुमान मंदिर जवळ, मुल-चंद्रपूर हायवे, चिचपल्ली,**
**ता.जि.चंद्रपूर पिन कोड क्र.** 441 224
E mail :- brtcchichpalli@gmail.com
Website :-www.brtc.org.in

**स्वा/-**
**संचालक**
**बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र,**
**चिचपल्ली**

# स्वयंघोषणापत्र

मी / आम्ही खाली सही करणारे, संस्थेचे नाव : ________________________________________
संस्थेचा पत्ता : __________________________________ नोंदणी क्रमांक : _________________________
CFC चे ठिकाण : ______________________________ याद्वारे स्वेच्छेने व संपूर्ण जबाबदारीने खालीलप्रमाणे स्वयंघोषणा करीत आहोत की, आमची संस्था बांबू आधारित सामूहिक उपयोगिता केंद्र (CFC) शेडेगाव, चिमूर चालविण्यासाठी निवड झाल्यास, स्थानिक स्तरावर बांबू प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवक / महिला / कारागिरांना प्राधान्याने काम / रोजगार उपलब्ध करून देईल. उपलब्ध कामाच्या स्वरूपानुसार (उत्पादन, प्रक्रिया, यंत्र संचालन, पॅकिंग, विपणन इ.) प्रशिक्षित स्थानिक मनुष्यबळाचा शक्य तितक्या जास्त प्रमाणात सहभाग सुनिश्चित करण्यात येईल. या बाबत शासनाच्या सामाजिक व रोजगाराभिमुख धोरणांचे पालन करण्यात येईल व यामध्ये कोणतीही टाळाटाळ करण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे शासननिर्णयानुसार आवश्यक अनामत रक्कम भरणा करण्यास संस्थेची निवड झाल्यास संस्था तयार राहील.

वरील स्वयंघोषणेमधील कोणतीही माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळल्यास, आमच्या संस्थेवर शासन निर्णयानुसार कारवाई करण्याचा अधिकार संबंधित प्राधिकरणास राहील, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. ही स्वयंघोषणा कोणत्याही दबावाशिवाय, सत्य व प्रामाणिकपणे देत आहोत.

**दिनांक :** ________________
**ठिकाण :** ________________

**अर्जदार संस्थेच्या वतीने**
**स्वाक्षरी :** ______________________
**नाव :** ________________________
**पद :** ________________________
**संस्थेची मोहोर**